# Shiladakriteshvarastutih

# शिलादकृतेश्वरस्तुतिः

## Document Information

Text title : Shiladakriteshvarastutih

File name : shilAdakRRiteshvarastutiH.itx

Category : shiva, vIrashaiva, stuti, aShTaka

Location : doc_shiva

Proofread by : Manish Gavkar

Description/comments : with Marathi meaning

Latest update : January 20, 2023

Send corrections to : sanskrit@cheerful.com

This text is prepared by volunteers and is to be used for personal study and research. The file is not to be copied or reposted without permission, for promotion of any website or individuals or for commercial purpose.

**Please help to maintain respect for volunteer spirit.**

Please note that proofreading is done using Devanagari version and other language/scripts are generated using **sanscript**.

January 20, 2023

*sanskritdocuments.org*

# शिलादकृतेश्वरस्तुतिः

शिलाद उवाच ।
भगवन् देवदेवेश त्रियम्बक ममाव्यय ।
पुत्रोऽसि जगतां यस्मात्त्राता दुःखाच्च किं पुनः ॥ ३७॥

रक्षको जगतां यस्मात्पिता मे पुत्र सर्वग ।
अयोनिज नमस्तुभ्यं जगद्योने पितामह ॥ ३८॥

पिता पुत्र महेशान जगतां च जगद्गुरो ।
वत्स वत्स महाभाग पाहिमां परमेश्वर ॥ ३९॥

त्वयाहं नन्दितो यस्मान्नन्दी नाम्ना सुरेश्वर ।
तस्मानन्दय मां नन्दिन्नमामि जगदीश्वरम् ॥ ४०॥

प्रसीद पितरो मेऽद्य रुद्रलोकं गतौ विभो ।
पितामहश्च भो नन्दिन्नवतीर्णे महेश्वरे ॥ ४१॥

ममैव जननं लोके सफलं जगतां प्रभो ।
अवतीर्णस्ततो नन्दिन् रक्षार्थं मह्यमीश्वरः ॥ ४२॥

तुभ्यं नमः सुरेशान नन्दीश्वर सुरेश्वर ।
पुत्र पाहि महाबाहो देवदेव जगद्गुरो ॥ ४३॥

पुत्रं त्वामेव नन्दीश मत्वा यत्कीर्तितं मया ।
क्षम्यतां क्षम्यतां वत्स स्तवस्तव्य सुरासुरैः ॥ ४४॥

एवं स्तुत्वा तुतं बालं प्रणम्य बहुमानतः ।
मुनीश्वरान् स सम्प्रेक्ष्य शिलादोवाच सुव्रतः ॥ ४५॥

इति श्रीमन्नीलकण्ठनागनाथाचार्यवर्यविरचिते श्रीमद्वीरमाहेश्वराचारसङ्ग्रहे
शिलादकृतेश्वरस्तुतिकथनं सम्पूर्णम् ।

(३७) शिलाद म्हणाला- परमेश्वरा, तूं सर्व देवांचा मुख्य देव आहेस, तुला त्रियंबक म्हणतात, तुझा नाश होत नाहीं, तूं सर्व जगांचे दुःख दूर करितोस. तूं माझा तर प्रत्यक्ष मुलगा झाला आहेस, मग माझें दुःख हरण कर असें तुला पुनः काय सांगावयाचें आहे ? तें तूं करशीलच.
(३८) ज्या अर्थी तूं सर्व जगांचे दुःख दूर करितोस, त्या अर्थी तूं सर्वांचा आईबाप आहेस. आतां तूं माझा पुत्र झाला आहेस, तरी तुला वाटेल तेव्हां वाटेल तेथें जाण्याचें सामर्थ्य आहे. तूं योनीपासून जन्मला नाहींस, तुला नमस्कार असो. तूं सर्व जगाचा मूलपुरुष आहेस, तूं सर्व जगाचा पितामह आहेस.
(३९) हे महेश्वरा, तूं सर्व जगाचा पिता आहेस, व पुत्रही आहेस. तूं सर्व त्रैलोक्याचा गुरु आहेस. मुला, अरे मुला, तूं मोठा भाग्यवान् आहेस, तूं परमेश्वर आहेस तूं माझें रक्षण कर.
(४०) तू जन्मास आल्याबरोबर तूं मला आनंदविलेस, म्हणून देवाधिदेवा तुझें नांव मी नंदी असे ठेवितों, हे नंदि, तूं मला नेहमीं असाच आनंद दे, मी तुला नमस्कार करितों. तूं त्रैलोक्याचा अधिपति आहेस.
(४१) तूं मजवर कृपा कर, तूं प्रत्यक्ष श्रीशिव आहेस, तूं माझे पोटीं जन्मास आलास म्हणून आतां माझे आईबाप आणि आजा रुद्रलोकास गेले.
(४२) नंदिकेश्वरा, तूं त्रैलोक्याचा अधिपति आहेस. तूं माझे पोटीं जन्मास आलास, त्यामुळे माझ्या जन्माचें सार्थक्य झाले. माझें रक्षण करावयासाठी प्रत्यक्ष तूं महादेवच माझे पोटीं जन्मलास.
(४३) तूं सर्व देवांचा अधिपति आहेस, तूं नंदिकेश्वर आहेस, तूं देवेंद्र आहेस, तूं मोठा पराक्रमी आहेस, तूं देवाधिदेव आहेस, तूं त्रैलोक्याचा गुरु आहेस, तुला नमस्कार असो.
(४४) नंदिकेश्वरा, तूं सर्व देवांचा मुख्य देव असतां, मी तुला वारंवार मुलगा मुलगा म्हणून हाटलें ह्याबद्दल तूं मला क्षमा कर. देव आणि दैत्य देखील तुझी स्तुति करितात, इतकी तुझी योग्यता मोठी आहे.
(४५) सनत्कुमारा, त्या सदाचारी शिलादानें त्या मुलाची (अल्पवयस्क माझी नंदीची) अशा रीतीनें आदरपूर्वक स्तुति करून, मला वरचेवर नमस्कार घातले, आणि सर्व मुनींकडे पाहून तो शिलाद म्हणाला.
(४६) शिलाद म्हणाला- हे ऋषीश्वरहो, माझें सुदैव कसें आहे तें पहा. माझ्या सुदैवाला कोठेंही विघ्न नाहीं. कां तर प्रत्यक्ष हा परमेश्वर नंदिकेश्वर माझ्या यज्ञांगणांत जन्मास आला.
(४७) हा नंदिकेश्वर परमात्मा माझें कल्याण करावयासाठीं यज्ञभूमीत माझा मुलगा म्हणून जन्मास आला. त्यामुळे माझ्यासारखा दैववान् पुरुष देवांत किंवा दैत्यांत कोणीतरी आहे काय ?

Proofread by Manish Gavkar

*Shiladakriteshvarastutih*

pdf was typeset on January 20, 2023

Please send corrections to *sanskrit@cheerful.com*